**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या**
**दिनांक १९/१२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता**
**आयोजित केलेल्या २५२ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

**बाब क्रमांक २५२/१**

**विषय :-** **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २४.१०.२०१३ रोजी झालेल्या २५१ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

-------------------

**ठराव क्रमांक : ६६४१** **दिनांक : २४/१०/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतींमध्ये मंडळाच्या ताब्यात असलेल्या मोकळया भूखंडावर जाहिरात फलक उभारावयाच्या कामांकरिता Experts ची एक समीती स्थापन करण्यात यावी. सल्लागार ( Consultant ) यांनी जाहिरातीसाठी जागा आणि प्रकार प्रस्तावित केल्यानंतर Expert Committee Asthetic दृष्टी व त्याचे evaluation करुन जागा आणि प्रकार ठरवतील. त्यानंतर प्रस्तावित कल्याप्रमाणे निविदेची कार्यवाही करण्यात यावी, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**च्याऐवजी**

**ठराव क्रमांक : ६६४१** **दिनांक : २४/१०/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतींमध्ये मंडळाच्या ताब्यात असलेल्या मोकळया भूखंडावर जाहिरात फलक उभारावयाच्या कामांकरिता Experts ची एक समीती स्थापन करण्यात यावी. जाहिरात देऊन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात यावी. सल्लागार ( Consultant ) यांनी जाहिरातीसाठी जागा आणि प्रकार प्रस्तावित केल्यानंतर Expert Committee Asthetic दृष्टी व त्याचे evaluation करुन

जाहिरातीच्या जागा, प्रकार व आकारमान ठरवतील. यांची जागा तसेच आकार आणि प्रकार, Asthetic दृष्टया योग्य आहे का हे निश्चित करावे. त्यानंतर प्रस्तावित कल्याप्रमाणे निविदेची कार्यवाही करण्यात यावी, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**बाब क्रमांक २५२/२**

**विषय :-** **म्हाडा करिता तयार केलेल्या प्रारुप लेखा संहिता व बांधकाम नियमावली (Account Code & Manual) यांना प्राधिकरणाच्या सभेत मजूरी घेणेबाबत.**

-------------------------

**ठराव क्रमांक : ६६४४** **दिनांक : १९/१२/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकरिता तयार केलेल्या प्रारुप लेखासंहिता व बांधकाम नियमावली Account Code & Manual गृहनिर्माण विभागाला सादर करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. सदर नियमावली शासनाकडून अंतिमत: मंजूर होईपर्यन्त प्रारुप Draft Account Code व Manual म्हाडामध्ये वापरास गृहनिर्माण विभागास मंजूरी मागण्याबाबतही संमती देत आहे.

**बाब क्रमांक २५२/५**

**विषय :-** **कोळे कल्याण, सांताक्रुझ (पूर्व) सर्व्हे क्र. १५७ व १५३ (भाग) सी.टी.एस.क्र. ५५९७,५५९८ ई, ५५९८ए एफ येथे मध्यम उत्पन्न गट व सर्व्हे क्र.१५ सी. टी. एस. क्र. ५६०८/अ (भाग) येथे उच्च उत्पन्न गट योजनेतील गाळयांचे बांधकाम.**
**--उच्च उत्पन्न गटातील सदनिकांचे चटई क्षेत्राबाबत--**

**-------------------**

**ठराव क्रमांक : ६६४५** **दिनांक : १९/१२/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, कोळे कल्याण, सांताक्रुझ (पूर्व) येथील सी.टी.एस.क्र. ५५९७,५५९८ ई, ५५९८ एफ व ५६०८/अ (भाग) येथे प्रस्तावित असलेल्या उच्च उत्पन्न गट योजनेतील योजनेपैकी यापूर्वीचे दि. ४.१०.२०१० रोजीचे ठराव क्र. ६४६६ मध्ये नमूद केल्यानुसार शासनाच्या राजपत्रित अधिका-यांच्या मैत्री सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिकांसाठी प्रत्येकी ८६१.१२ चौ. फुट चटई क्षेत्रफळाऐवजी प्रत्येक सदनिकेचे चटई क्षेत्रफळ १०७६.०० चौ. फुट (Fungible सोडून) करण्यास प्राधिकरण मंजूरी देत मंजूरी देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २५२/१२**

**विषय :- लातूर येथील अतिरीक्त एम.आय.डी.सी. क्षेत्रातील भूखंड क्र.आर-१ या म्हाडाच्या जमिनीवरील ९९१ भूखंड विनियम १३(२) अन्वये राष्ट्रीय गुमास्ता मंडळाच्या सभासदांना वाटप करणेचा प्रस्ताव रद्द करणेबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६४६** **दिनांक : १९/१२/२०१३**

लातूर येथील अतिरिकत एम.आय.डी.सी. क्षेत्रातील भूखंड क्र.आर-१ या म्हाडाच्या जमिनीवरील ९९१ भूखंड विनियम १३ (२) अन्वये गुमास्ता मंडळास वाटप करण्याचा ठराव क्र.६३१९ रद्द करण्यात येत आहे व त्यासंबधीचा शासन निर्णय रद्द करण्यासाठीची बाब प्राधिकरण स्तरावरुन शासनाकडे सादर करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.